३)

पूल व मो-या यांची पाहणी व
आवश्यक दुरूस्त्या वेळेत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन परिपत्रक क्र.आरमआर-२००६/प्र.क्र.८/रस्ते-१
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २५.१.२००६

रस्त्यावरील पूल, मो-या कॉजवे इत्यादीची वेळोवेळी देखभाल व दुरूस्ती ही अखंडीत वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. जुलै व ऑगस्ट २००५ मधील झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्यासोबतच पूल व मो-यांची मोठ्या प्रमाणावर हानी झाली. काही ठिकाणी रस्त्यावरील वाहतुकही खंडीत झाली होती. या पार्श्वभूमीवर पूल व मो-यांची पाहणी व त्यांची आवश्यकतेनुसार वेळेत दुरूस्ती या बाबी लक्षपूर्वक व परिणामकपणे होणेची आवश्यकता दिसून येते. या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१) सर्व पूल व मो-यांची पावसाळा पूर्व व पावसाळ्यानंतर पाहणी यापूर्वीच्या शासन सूचनानुसार करण्यात यावी.

२) पूल व मो-यांची पाहणी कनिष्ठ अभियंता, उपअभियंता,कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, व मुख्य अभियंता यांनी शासन परिपत्रक क्र.एमआयएस/ ३३६६/एनएच-२ दि.२१.३.१९९८ मध्ये नमूद केलेल्या वांरवारतेनुसार करण्यात यावी.

३) पूल व मो-यांची पाहणी करतांना, सर्वसाधारणपणे कोणत्या बाबींची पाहणी करण्यात यावी याबाबत शासन परिपत्रक आरएमआर-१०८२/(२१४)/रस्ते-१ दि.८.१०.१९८४ मध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार पाहणी करण्यात यावी याबाबत भारतीय रस्ते महासभा स्पेशल पब्लीकेशन-१८ या मध्येही सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

४) पूलांचे पाहणीमध्ये निदर्शनास आलेल्या बाबी पूल पाहणी रजीस्टरमध्ये नोंदवून तातडीच्या दुरूस्त्या/लगेचच करता येण्यासारख्या दुरूस्त्या हाती घेणेसाठी कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही करून अशा दुरूस्त्या हाती घ्याव्यात. काही पूलांचे

बाबतीत काही विशेष/गुंतागुंतीच्या बाबी निदर्शनास आल्यास अशा पूलांचे बाबतीत सविस्तर पूलाची पाहणी/तपासणीसाठी अधीक्षक अभियंता,यांचे निदर्शनास आणावे व आवश्यकतेनुसार सविस्तर पाहणी/तपासणी करून घ्यावी, त्यानुसार दुरूस्तीसाठी कार्यवाही करावी.

५) ब-याच वेळेस पूलाची पाहणी झाली,पाहणी रजीस्टरमध्ये पाहणीच्या नोंदी घेतल्या, तथापि, पाहणी निष्कर्षांनुसार निदर्शनास आलेल्या काही किरकोळ स्वरूपाच्या दुरूस्त्या जसे की मेसनरी पीअर अबरमेंटला पॉइंटिंग,मेसनरीचे निखळलेले दगड पूर्ववत बसवणे इत्यादी बाबी संबधीताचा पाठपुरावा न झालेने वेळत न होण्याची शक्यता असते व या किरकोळ दुरूस्त्या वेळेत न झालेने पूल खचण्यासारखी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही व तदनंतर मोठ्या प्रमाणावर दुरूस्त्यांची/ नवीन बांधकामाची आवश्यकता निर्माण होते. अशी परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून या दुरूस्त्या वेळेत होत आहे./ झालेल्या आहेत याबाबत अधीक्षक अभियंता यांनी खात्री करावी.

६) पूलांची पाहणी व आवश्यक दुरूस्त्या वेळेत व्हाव्या यासाठी मुख्य अभियंता,/अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे जिल्हयाचे पाहणी दौ-यांचे वेळेस पूल पाहणी रजीस्टर आवर्जून पाहावेत.पूलाची पाहणी तसेच दुरूस्त्या सक्षम स्तरावरून मान्यता घेवून त्या झालेल्या आहेत/होत आहेत याबाबत खात्री करावी.

७) पावसाळ्यानंतरची पाहणी दि.१५ फेब्रुवारी पूर्वी होईल याबाबत मुख्य अभियंता यांनी पुनश्च खात्री करावी. व शासनास अवगत करावे.

( भा.श. उमाटे )
उपसचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,

सर्व मुख्य अभियंते,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
सर्व अधीक्षक अभियंते,सार्वजनिक बांधकाम मंडळ,
सर्व कार्यकारी अभियंते,सार्वजनिक बांधकाम विभाग,